मौजे मौदा ता. मौदा, जि. नागपूर येथील प.ह. नं.७३ सर्व्हे क्र. ४५० एकूण आराजी ०.३८ हे.आर ही नझुल सरकार प्राथमिक आरोग्य केंद्राची जागा महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२०६(१४८७४६५)/आरोग्य ३
गो.ते.रुग्णालय संकुल, दहावा मजला, संकुल इमारत
मंत्रालय, मुंबई ४००००१
दिनांक : १३ ऑगस्ट, २०२६.

वाचा :- १) महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्र.जमीन ०४/२००६/प्र.क्र.३५/ज-१, दि.०८.०९.२००८

२) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.२३०/आरोग्य ३, दि.३१.०७.२०१९.

३) सहसंचालक, आरोग्य सेवा, (प्राआकेंद्र/उपकेंद्र/दवाखाने), मुंबई यांचे पत्र क्रमांक : संआसे /कक्ष-७अ /टे-८ /मौदा /जागा हस्तांतरण /प्राआकेंद्र /नागपूर /३१७८-८० /२०२३,दिनांक- ०८.०५.२०२३

प्रस्तावना :-

मौजे मौदा, ता. मौदा, जि. नागपूर येथे नवीन ग्रामीण रुग्णालय मंजूर झाल्याने वाचा क्र.२ येथील सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दि.३१.०७.२०१९ अन्वये मौजे मौदा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र मौजे चिरव्हा, ता. मौदा येथे स्थलांतरीत करण्यात आले आहे. मौजे मौदा येथील जुनी प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत अत्यंत जीर्ण झालेली असून निर्लेखनाच्या अवस्थेत असल्यामुळे

सध्या सदरील इमारतीमध्ये आरोग्य सेवाविषयक कोणतेही कामकाज होत नाही. त्यामुळे मौजे मौदा, ता. मौदा, जि. नागपूर येथील प.ह. नं.७३ सर्व्हे क्र. ४५० एकूण आराजी ०.३८ हे.आर ही नझुल सरकार प्राथमिक आरोग्य केंद्राची जागा नागरीकांच्या मुलभूत सुविधा पुरविण्याकरीता नगर पंचायत, मौदा यांना देण्याकरीता महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील मौजे मौदा, ता. मौदा, जि. नागपूर येथील प.ह. नं.७३ सर्व्हे क्र. ४५० एकूण आराजी ०.३८ हे.आर ही नझुल सरकार प्राथमिक आरोग्य केंद्राची जागा नागरीकांच्या मुलभूत सुविधा पुरविण्याकरीता नगर पंचायत, मौदा यांना हस्तांतरीत करण्यासाठी महसूल व वन विभाग (जिल्हाधिकारी, नागपूर) यांच्याकडे वर्ग करण्यास सार्वजनिक आरोग्य विभागाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८१३१३००११५५१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHESH MADHUKAR LAD

Digitally signed by MAHESH MADHUKAR LAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=25beab36016c9d18b34e813ce2c51ae3ba862f5ee940326a80ef8dfa067b2f3b, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2B0B7B24B48EA4D47E171EF81F64A0D535EBB08400DA6060265D4872BADAEACA, cn=MAHESH MADHUKAR LAD
Date: 2026.08.13 15:39:24 +05'30'

(महेश लाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण यांचे खाजगी सचिव
२. अपर मुख्य सचिव, महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
३. महालेखापाल, (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १/ २, मुंबई/ नागपूर.
४. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
५. जिल्हाधिकारी, नागपूर.

६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर.
७. संचालक (१), आरोग्य सेवा आयुक्तालय, आरोग्य भवन, मुंबई.
८. सह संचालक, आरोग्य सेवा (प्राआकेंद्र/उपकेंद्र/दवाखाने), आयुक्तालय,मुंबई.
९. उप संचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर.
१०. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर.
११. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
१२. निवडनस्ती (पा.सु.१)